# बळवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जळगाव

**ISO 9001 : 2015 मानांकित**

१४, प्रताप नगर, जळगाव. ४२५००१ फोन नं. : ०२५७-२२३३०२५

बुक-पोस्ट

# वार्षिक अहवाल सन २०२३ - २४

## २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**(केवळ सभासदांसाठी)**

मा. श्री./सौ.

सभासद बंधू/भगिनींना विनंती की, आपल्या पतसंस्थेची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **दिनांक २५ ऑगस्ट २०२४** रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता **ब्राह्मण सभा, बळीराम पेठ, जळगाव** येथे खालील विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**-: सभेचे विषय :-**

०१) दि. ३० एप्रिल २०२३ रोजी झालेल्या तेविसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
०२) दि. ३१ मार्च २०२४ अखेर संचालक मंडळाचा वार्षिक अहवाल, लेखापरिक्षीत ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व स्वीकृत करणे.
०३) वैधानिक लेखा परिक्षक यांनी सादर केलेल्या सन २०२३-२४ च्या लेखा परिक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे. तसेच सदर अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल स्वीकृत करणे.
०४) संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२३-२०२४ च्या नफा विभागणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
०५) सन २०२४-२५ करीता तयार केलेल्या अंदाजपत्रकास आणि सन २०२३-२४ च्या अंदाज पत्रकातील खर्चाची माहीती देणे आणि मान्यता देणे.
०६) सन २०२४-२०२५ करीता वैधानिक लेखा परिक्षकांची नेमणूक करणे, लेखापरिक्षणासाठीचे मानधनास मान्यता देणे. सन २०२४-२५ साठी वैधानिक लेखा परिक्षक म्हणून श्री. अनिल दि. कुळकर्णी, चार्टर्ड अकौंटंट्स्, जळगाव यांच्या नेमणुकीची संचालक मंडळ शिफारस करीत
०७) मा. वैधानिक लेखा परिक्षक यांनी प्रमाणित केलेली थकीत कर्ज खाती निर्लेखित करणे.
०८) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
०९) सामोपचार परतफेड योजने अंतर्गत कर्जखात्याची नोंद घेणे.
१०) प्रशिक्षण/कर्ज/गुंतवणुक/वसुली इत्यादी तत्सम विषयाबाबतच्या वार्षिक धोरणांना मान्यता देणे.
११) संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरूस्तीस मंजुरी देणे.
१२) पतसंस्थेचे विस्तारित कक्ष/नविन शाखा उघडणे व जागा भाडेपट्टाने घेणे/इमारत घेणे अथवा बांधकाम करण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यास संचालक मंडळास अधिकार प्रदान करणेबाबत.
१३) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१४) मा. अध्यक्ष यांचे पुर्व परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे.

जयदिप शाह
मुख्य कार्यकारी अधिकारी
(संचालक मंडळाच्या आदेशावरून)

जळगाव
दिनांक : १० ऑगस्ट २०२४

**सुचना :-**

- सभासदांना संस्थेच्या कामकाजाविषयी माहिती व प्रश्न विचारायचे असतील तर त्यांनी दि. २२/०८/२०२४ पूर्वी संस्थेच्या मुख्य कार्यालयात लेखी स्वरूपात द्यावे.
- गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी, अर्ध्या तासानंतर सुरू होईल. या सभेस गणसंख्या पुर्ततेची आवश्यकता राहणार नाही.
- संस्थेच्या २४व्या वार्षिक सभेची सूचना कार्यक्रम पत्रिकेसह सर्व सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर पाठविण्यात आलेली आहे. तथापि संचालक मंडळाचा अहवाल, पतसंस्थेचा लेखा परिक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक सभासदांना संस्थेच्या मुख्य कार्यालय व शाखांच्या नोटीस बोर्डावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**※ सत्कार ※**

सभासदांना कळविण्यात येते की, दि. २५/०८/२०२४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत करावयाच्या सत्कारासाठी खालील दिलेल्या शर्तीस पात्र राहून ज्या सभासदांनी, कर्मचाऱ्यांनी तसेच त्यांच्या पाल्यांनी नैपुण्य प्राप्त केले असेल त्यांनी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात दि. २२/८/२०२४ पर्यंत कागदपत्र आणून द्यावे.

**सत्कार फक्त पतसंस्थेचे सभासद, कर्मचारी तसेच त्यांच्या पाल्यांसाठीच लागू राहील.**

१) **शिष्यवृत्ती** :- प्राथमिक/माध्यमिक शिष्यवृत्ती मिळविलेले.
२) **शैक्षणिक** :- अ)इ.१०वी व १२वी परिक्षेत ८५% वा त्यापेक्षा जास्त गुण असावेत.
ब) पदवी परिक्षेत ७०% व पदव्युत्तर परिक्षेत ६५% वा त्यापेक्षा जास्त गुण असावेत.
३) **कला व क्रीडा** :- शासनाने अथवा कोणत्याही विद्यापीठाने आयोजीत केलेल्या स्पर्धेमध्ये विशेष पारितोषिक मिळाले असावेत.
४) **विशेष नैपुण्य** :- अ) राज्य पातळीवर बक्षीस मिळविलेले.
ब ) इतर विशेष प्राविण्य मिळविलेले. (संचालक मंडळाच्या अंतिम मान्यतेवर आधारित)

**● महत्त्वाच्या सुचना ●**

१) ज्या सभसदांचा पत्ता बदलला असेल त्यांनी आपला नवीन पत्ता, फोन/मो. नंबर, ई-मेल इ. माहिती संस्थेच्या शेअर विभागास लेखी स्वरूपात त्वरीत कळवावी.
२) सभासदांनी स्वत: आपल्या पतसंस्थेस बचत खाते उघडावे जेणे करून बचत खाते उडल्यास सभासदांना देय झालेला भागावरील लाभांश त्यांच्या बचत खात्यामध्ये जमा करता येईल. आपले सर्व आर्थिक व्यवहार आपल्या पतसंस्थेमार्फतच करावेत.

**● कर्जदारांच्या हितासाठी ●**

१) नियमित कर्ज फेडणारे कर्जदार हे अभिनंदनास पात्र आहे.
२) जबाबदारी टाळून कर्ज न फेडणाऱ्या कर्जदारांना ताकीद देण्यात येत आहे की, सुधारणा न केल्यास यात ते स्वत:च्या नुकसानीस कारणीभुत ठरतील याची त्यांना जाणीव असू द्यावी.
३) कर्ज वेळेवर फेडणे कर्जदाराच्या सन्मानाचे असून संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने हिताचे राहील हे लक्षात असू द्यावे.
४) कर्जफेड लवकर व्हावी यासाठी आमच्या दैनंदिन ठेव योजना सुरू आहे. त्यात दर महिन्यात जमा होणारी रक्कम त्याच महिन्यात कर्जात वर्ग केली जाते. संस्थेच्या व आपल्या हितासाठी या योजनेचा लाभ घ्यावा.
५) कर्जदारांनी एन.पी.ए.च्या दृष्टीने हप्ते नियमित फेड करून आपले कर्जाचे खाते एन. पी. ए. होणार नाही व जेणे करून आपल्या जामीनदारास त्याच्या कर्ज घेण्याच्या हक्कापासून वंचीत होता येणार नाही याची काळजी घ्यावी.

**● संचालक मंडळ कार्यकाल जानेवारी २०१७ ते जुलै २०२४ ●**

| अ.क्र. | संचालकांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| ०१) | श्री. मधुकर धोंडु पाटील | अध्यक्ष |
| ०२) | श्री. राधेश्याम लक्षीनारायण बजाज | उपाध्यक्ष |
| ०३) | श्री. सुनिल राजाराम याज्ञिक | संचालक |
| ०४) | श्री. विनोद सुभाष पाटील | संचालक |
| ०५) | श्री. पवनकुमार संतलाल मित्तल | संचालक |
| ०६) | श्री. संदीप अमृतलाल लाड | संचालक |
| ०७) | श्री. सतीश विश्वासराव मोरे | संचालक |
| ०८) | श्री. संजय वसंतराव कासार | संचालक |
| ०९) | श्री. लक्ष्मीनारायण मधुकर सोनवणे | संचालक |
| १०) | सौ. कुमुदिनी विजय नारखेडे | संचालिका |
| ११) | सौ. सविता गिरीष नाईक | संचालिका |
| १२) | श्री. जयदिप घन:शामदास शाह | मुख्य कार्यकारी अधिकारी |

**●नवनिर्वाचित संचालक मंडळ कार्यकाळ जुलै २०२४ ते जुलै २०२९●**

| अ.क्र. | संचालकांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| ०१) | श्री. राधेश्याम लक्ष्मीनारायण बजाज | अध्यक्ष |
| ०२) | सौ. सविता गिरीष नाईक | उपाध्यक्षा |
| ०३) | श्री. संदीप अमृतलाल लाड | संचालक |
| ०४) | श्री. संजय वसंतराव कासार | संचालक |
| ०५) | ॲड. श्री. प्रवीण राजमल झवर | संचालक |
| ०६) | श्री. राजेंद्र विश्वनाथ पाटील | संचालक |
| ०७) | श्री. पद्माकर तुळशीराम इंगळे | संचालक |
| ०८) | श्री. मिलिंद घन:श्याम चंदनकर | संचालक |
| ०९) | श्री. महेश रामदास संत | संचालक |
| १०) | श्री. प्रमोद कौतिक माळी | संचालक |
| ११) | सौ. शोभना गजानन खोरखेडे | संचालिका |
| १२) | श्री. जयदिप घन:शामदास शाह | मुख्य कार्यकारी अधिकारी |

### ❋ वार्षिक इतिवृत्त ❋

सन्माननीय बंधु व भगिनींनो, आपल्या संस्थेचे सन २०२३-२०२४ चे वार्षिक इतिवृत्त सादर करतांना आम्हाला आनंद होत आहे. सहकार क्षेत्रात होणारी दैनंदिन स्थित्यंतरे व त्यामुळे व्यवहारावर होणाऱ्या प्रतिकुल परिस्थितीत सुध्दा सर्व सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांनी संस्थेवर जो अढळ विश्वास ठेवला अशा सर्वांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण ठेऊन संस्थेचा अहवाल आपणापुढे सादर करीत

* **भागभांडवल :–** अहवाल वर्ष अखेरीस रु. ८६.६० लाख आहे.
* **निधी :–** अहवाल वर्षाच्या सुरवातीस संस्थेचा एकूण निधी रु. ११४७.९७ लाख एवढा होता. अहवाल वर्षात त्यामध्ये रु. १४२.५३ लाखाने वाढ झाली असून अहवाल वर्ष अळेरीस १२९०.५० रु. लाख झाला आहे.
* **ठेवी :–** ठेवी संलनाच्या वाढीची परंपरा दरवर्षी प्रमाणे या वर्षीही अभिमानास्पद आहे. अहवाल वर्ष सुरवातीस संस्थेच्या २७.१२ कोटी एवढ्या ठेवी होत्या. वर्षभरात रु. १.२० कोटी एवढ्या ठेवींमध्ये वाढ होवून वर्ष अखेरीस रु. २८.३२ कोटी एवढ्या ठेवी आहेत.
* **कर्ज :–** संस्थेने केलेली कर्ज वाटप वाढीची परंपरा कायम ठेवत यावर्षीही अभिमानास्पद कर्ज वाटप केली आहे. अहवाल वर्ष सुरवातीस संस्थेचे रु. १८.३९ कोटी एवढे येणे कर्ज होते. वर्षभरात रु. ३.०४ कोटी येणे कर्जात वाढ होवून वर्ष अखेरीस रु. २१.४३ कोटी एवढे येणे कर्ज आहे.
* **गुंतवणूक :–** वर्ष अखेर रु. १८.९० कोटी संस्थेची गुंतवणूक आहे. वैधानिक रोख राखीव गुणोत्तर १% आवश्यक असून संस्थेचे रोख राखीव गुणोत्तर (CRR) १.०३ % इतके आहे. तसेच वैधानिक तरलता गुणोत्तर २५% आवश्यक असून संस्थेचे तरलता गुणोत्तर (SLR) २८.३३% इतके आहे.
* **स्थावर मालमत्ता गुंतवणूक :–** अहवाल वर्षाच्या सुरवातीला स्थावर मालमत्ता गुंतवणूक रु. १०२.४९ लाख असून रु. ५.१२ लाख घसारा वजा करता अहवाल वर्षअखेर रु. ९७.३७ लाख गुंतवणूक आहे.
* **एन. पी. ए. व तरतुदी :–** संस्थेने निव्वळ एन. पी. ए. चे प्रमाण “0%” राखण्यास यश प्राप्त केले आहे. तसेच एन. पी. ए. ची तरतुदी सहकार कायद्या अंतर्गत केली आहे.
* **नफा व नफा विनियोग :–** संस्थेचा कमी व्यवस्थापन खर्च व अधिक उत्पादकता, एन. पी. ए. खात्यात झालेली वसुली या सर्वांचा परिणाम म्हणून संस्थेस अहवाल वर्ष अखेर निव्वळ नफा रु. ६२.४५ लाख झाला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ६५ नियम ५० नुसार खालीलप्रमाणे नफा विभागणीची शिफारस केलेली आहे. सदर नफा विभागणीस मान्यता प्रदान करावी, ही विनंती.

### ❁ प्रस्तावित नफा विभागणी ❁

| तपशील | रक्कम |
|---|---|
| राखीव निधी (२५%) | १५,६४,१२०.०६ |
| लाभांश (१०%) | ८,५३,९९६.०० |
| इमारत निधी | १५,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | १,००,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | १,२५,०००.०० |
| संशयीत निधी | १०,००,०००.०० |
| धर्मदाय निधी | ६२,०००.०० |
| निवडणूक निधी | ५०,०००.०० |
| महोत्सव निधी | ५,००,०००.०० |
| शैक्षणिक निधी | ४०,०००.०० |
| आकस्मित निधी | ४,५०,०००.०० |
| **एकूण** | **६२,४५,११६.०६** |

* **लाभांश :–** चालू वर्षी १०% लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.
* **व्यवसाय वृद्धी :–** संस्थेची गुणात्मक वाढीसाठी महाराष्ट्र राज्य सहकार खात्याने पतसंस्थांना दिलेली स्वायत्त लक्षात घेऊन समाजातील कोणताही घटक संस्थेच्या सुविधांपासून वंचित राहणार नाही.

  यासाठी संस्थेने ग्राहक वाढविणे, त्यांच्याशी दिर्घकाळ नाते सांभाळणे याच तत्वाचा स्विकार करून कार्यवाही सुरू केली आहे. संस्थेच्या सर्व सामान्य सभासदांना “एक कुटुंब एक पतसंस्था” योजनेद्वारे आर्थिक सेवा, महिला बचतगटाच्या माध्यमातून त्यांना संस्थेविषयी माहिती देण्यात येत आहे. विविध ठेव योजना सुरू केल्या असून आपले ग्राहक लक्षाधिश झालेले आहेत.
* **अंतर्गत लेखा परिक्षण :–** अहवाल वर्षात पतसंस्थेच्या दैनंदिन कामजावर नियंत्रण आणणेसाठी श्री. सुनिल दि. कुळकर्णी यांनी अंतर्गत हिशेब तपासणीस म्हणून नेमणुक करण्यात आली होती. त्यांनी ३१/०३/२०२४ अखेर हिशेब तपासणी पूर्ण करून त्याबाबतचा अहवाल संस्थेस दिला आहे. अंतर्गत हिशेब तपासणीस यांनी केलेल्या मार्गदर्शनाबाबत आभारी आहोत.
* **वैधानिक लेखा परिक्षण :–** अहवाल वर्ष २०२३-२४ साठी वैधानिक लेखा परिक्षक म्हणून सी. ए. एस. आर. पवार यांची नियुक्ती करण्यात आली होती. अहवाल वर्षात वैधानिक लेखा परिक्षकांनी हिशोब तपासणी पूर्ण केली असून संस्थेच्या व्यवहाराबाबत अहवाल सादर केला आणि समाधान व्यक्त करून बहुमोल मार्गदर्शन केले. संस्थेने या सहकार वर्षासाठी अ‍ॅाडिट वर्ग “अ” कायम ठेवला आहे.
* **सभासद प्रशिक्षण :–** संस्थेच्या सभासदांना प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याने म. संस्था अधिनियम १९६० चे कलम २४(अ) उपकलम (३) व १९३१ चे नियम ३० (अ) उपनियम (६) अन्वये संस्थेतर्फे प्रशिक्षण वर्ग घेवून माहिती पत्रकाद्वारे सविस्तर माहिती देण्यात आली.
* **संचालक व कर्मचारी प्रशिक्षण :–** संस्थेच्या सेवकांना कार्यपध्दती, योजना, नियम व मार्गदर्शनपर तत्वे यांची माहिती व्हावी यासाठी सातत्याने प्रशिक्षण देण्याची गरज निर्माण झाली आहे. आपली संस्था याबाबत कार्यतत्पर असून या अहवाल वर्षातही प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.
* **मनुष्यबळ (एच.आर.डी.) :–** स्पर्धात्मक वातावरणात संस्थेचा विस्तार आराखडा कार्यान्वीत करतांना संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक वाढीकरीता व्यवस्थापनाने मनुष्य बळासाठी प्रयत्न केले आहेत. कर्मचाऱ्यांचे कौशल्य विकसीत करण्याचे प्रयत्न अविरत सुरू आहेत. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांची कौटुंबिक सहल काढण्यात येते. संस्थेत सध्या १० कर्मचारी असून त्यात ३ अधिकारी, ३ हिशोबनीस, ३ कनिष्ठ लिपीक व १ सेवक आहेत.
* **लाभार्थी :–** दरवर्षी रु. २५,०००.०० कर्ज घेणाऱ्या कर्जदारांचा संस्थेतर्फे वैयक्तिक अपघाती विमा संस्थेच्या खर्चातून काढण्यात येतो. तसेच या आर्थिक वर्षात ५ सभासदांनी मोतीबिंदु शस्त्रक्रियेचा, ५ धार्मिक विधी असे एकूण १० सभासदांनी या योजनेचा लाभ घेतला.
* **दैनंदिन संचय ठेव योजना :–** दैनंदिन ठेव योजनेचे ४ प्रतिनिधी आहेत. त्यांचे कार्य हे संस्थेच्या प्रगतीस सहाय्य करणारे आहे.
* **संचालक नातेवाईक कर्ज :–** संस्थेच्या संचालकांच्या नातेवाईकांना संस्थेकडून दिल्या गेलेल्या अहवाल वर्ष अखेर कर्जाची येणे बाकी रुपये ०/- असून ही रक्कम संस्थेच्या एकूण येणे कर्ज रकमेच्या केवळ ०.००% एवढी आहे. या कर्जापैकी कोणतीही रक्कम थकित नाही.
* **संचालक मंडळ व उपसमिती सभा :–** अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १२, कर्ज उपसमितीच्या ५१ सभा झाल्या आहेत.

### ❋ वृत्त विशेष ❋

* **वेब बेस्ड् प्रणालीवर आधारित अद्यावत कोअर सॉफ्टवेअर :–** पतसंस्थेच्या सन्मानीय ग्राहक यांना व्यवहार करणे सोयीचे होण्यासाठी व आधुनिक तंत्रज्ञानाच्या दृष्टीने वेब बेस्ड् प्रणालीवर आधारित अद्यावत कोअर सॉफ्टवेअर व एनी ब्रँच बँकिंग (ए.बी.बी.) सुविधा मुख्य कार्यालय व सर्व शाखांमध्ये सुरू करण्यात आलेले आहे.
* **मुख्य कार्यालयाचा वर्धापन दिन :–** मुख्य शाखेचा २३वा वर्धापन दिनाचे औचित्य साधून दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी संस्थेने QR कोड स्कॅन अँड पे ही आधुनिक सुविधा उपलब्ध करून ग्राहकांना घरी बसल्या संस्थेतील स्वत:च्या खात्यात पैसे जमा करता येतात.
* **एम. आय. डी. सी. शाखेचा वर्धापन दिन :–** बळवंत पतसंस्थेच्या एम. आय. डी. सी. शाखेचा अकराव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून दि. ०१ जुलै २०२३ रोजी पर्यावरणाच्या संरक्षणार्थ वृक्षारोपण व संवर्धनाचे हेतू साध्य करीत सभासदांना वृक्ष व ट्रिगार्ड वाटप करण्यात आले.
* **पाणी वाटप :–** शहरात निघणाऱ्या विविध समाज माध्यमांच्या शोभायात्रा प्रसंगी संस्थेतर्फे पाणी वाटपाची व्यवस्था करण्यात येते.
* ग्राहकांसाठी शाडू मातीचे गणपती बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली.
* ग्राहकांसाठी नवरात्र उत्सवानिमित्त महिला ग्राहकांना गरबा नृत्य प्रशिक्षण देण्यात आले.
* महिलांसाठी ब्युटीपार्लर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.
* श्रावण मासानिमित्त ५०० बेलांचे झाडांचे वाटप करण्यात आले.
* श्रावणमास, गणेश उत्सव, दुर्गादेवी उत्सवानिमित्त शहरातील वेगवेगळ्या भागातील मंदिरामध्ये आरती संग्रह वाटप.



## भावपूर्ण श्रध्दांजली




**अहवाल वर्षात दिवंगत झालेले सभासद, ग्राहक, हितचिंतक तसेच सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, साहित्य-कला, सहकार व राजकीय क्षेत्रातील, तसेच नैसर्गिक उत्पात इ. यामुळे प्राणास मुकलेल्या ज्ञात व अज्ञात, माता-बंधू-भगिनींना, तसेच मातृभूमीच्या सेवेत कामी आलेले जवान यांना आम्ही श्रध्दासुमने अर्पण करीत आहोत.**



## मुख्य कार्यालय व शाखा

| मुख्य कार्यालय व प्रतापनगर शाखा | नवीपेठ शाखा | एम.आय.डी.सी. शाखा |
|---|---|---|
| १४, प्रतापनगर, जळगाव. फोन नं.०२५७-२२३३०२५ | ७२, नवी पेठ, जळगाव. फोन नं.०२५७-२२२२२०८ | पी-३, पहिला मजला, सहकारी औद्योगिक वसाहत संकुल, अजिंठा रोड, एम.आय.डी.सी., जळगाव. फोन : ०२५७-२२७१०४० |

## लॉकर सुविधा उपलब्ध



### ● परिशिष्ट "अ" ●

| | | |
|---|---|---|
| ०१ | पतसंस्थेचे नाव | बळवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्या., जळगाव |
| ०२ | मुख्य कार्यालय पत्ता | १४, प्रताप नगर, जिल्हा पेठ, जळगाव. |
| ०३ | रजिस्ट्रेशन नं. व रजि. दिनांक | जेजीए/जेजीए/आरएसआर/सिआर/२२३/ सन २००० दि. ३१/१२/२००० |
| ०४ | कार्यक्षेत्र | जळगाव जिल्हा |
| ०५ | तपशील | ३१ मार्च २०२४ अखेर |
| ०६ | शाखा | ३ |
| ०७ | सभासद सर्वसाधारण | २७११ |
| ०८ | वसुल भागभांडवल | ८६.६० लाख |
| ०९ | राखीव व इतर निधी | १२९०.५० लाख |
| १० | ठेवी | २८३२.०९ लाख |
| ११ | कर्ज व अग्रीम | २१४३.८० लाख |
| १२ | गुंतवणुक | १८९०.७१ लाख |
| १३ | सी. आर. आर. | १.०३% |
| १४ | एस. एल. आर. | २८.३३% |
| १५ | नफा | ६२.४५ लाख |
| १६ | खेळते भांडवल | ४२०९.२० लाख |
| १७ | निव्वळ एन. पी. ए. | ०% |
| १८ | कर्मचारी | १० |
| १९ | भांडवल पर्याप्तता | ३७.०८% |
| २० | लेखा परिक्षण वर्ग (२०२३-२४) | "अ" |

### ● सभासदांकरीता कल्याणकारी योजना ●

१) सभासदाचा मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना धार्मिक कर्तव्यपुर्तीसाठी रु. २,५००.०० ची तात्काळ मदत करण्यात येते.

२) डोळ्याच्या शस्त्रक्रियेसाठी रु. २,५००.०० ची आर्थिक मदत.

३) सभासदाची बायपास शस्त्रक्रिया, कॅन्सर उपचार, एंज्योप्लास्टी तसेच किडनी संबंधीत मोठे आजार यासाठी रु. १०,०००.०० ची आर्थिक मदत.

५) संस्थेचा "रूग्ण साहित्य सेवा प्रकल्प" सुरू आहे. सदर रूग्ण साहित्य मोफत वापरण्यासाठी दिले जाते. रूग्ण साहित्य मिळण्याचे ठिकाण : रा. स्व. संघ जनकल्याण समिती "गायत्री मंदिर" विसनजी नगर, जिल्हापेठ, जळगाव.

६) सभासदास वैद्यकीय उपचारासाठी संस्थेकडून रुपये १,००,०००.०० पर्यंत कर्ज फक्त ९% व्याज दराने उपलब्ध.

७) शैक्षणिक, क्रीडा, विशेष नैपुण्य मिळविलेल्या सभासद व सभासदांच्या पाल्यांचा सत्कार संस्थेतर्फे करून भेटवस्तु देऊन गौरविण्यात येते.

### ● वैधानिक लेखा परिक्षक अहवाल ●

महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सहकारी संस्थांचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा मी बळवंत नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जळगाव या संस्थेचा सोबत जोडलेला ३१/०३/२०२४ या दिनांकाचा ताळेबंद सन २०२३-२४ या सहकारी वर्षाचे नफा-तोटा पत्रक तपासले असून अहवाल सादर करतो की,

1 माझ्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी, माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व माहितीप्रमाणे, विश्वासाप्रमाणे खालीलप्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलाशे मला उपलब्ध झालेले आहेत.

2 अ-माझ्या मते मिळालेल्या माहिती खुलाशाचे आधारे अ-ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबाच्या वास्तव स्थिती दर्शवितो आणि नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो.

2 ब- संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिपणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० नुसार आवश्यक ती माहिती देतात व सदर हिशोब पत्रके संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शविणारे आहेत.

3 माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थेचा कायदा, नियम संस्थेचे पोटनियम यानुसार आवश्यक असणारी हिशोब पुस्तके योग्य रितीने ठेवलेली आहेत.

4 सन २०२३-२४ या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखा परिक्षण वर्ग "अ" देण्यात आला आहे.

**जळगाव :- जळगाव.**
**दिनांक :- २५/०७/२०२४**

**एस. आर. पवार**
सनदी लेखा परिक्षक
वैधानिक लेखा परिक्षक, जळगाव

### ● संस्थेची प्रगती पथावरील वाटचाल ●

| तपशील | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| सभासद संख्या | २३०५ | २४७६ | २५४८ | २६३७ | २७११ |
| अधिकृत भाग भांडवल | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १५०.०० |
| वसुल भाग भांडवल | ९१.४९ | ९१.७६ | ८९.५५ | ८७.०९ | ८६.६० |
| स्वनिधी व इतर निधी | १०७८.६१ | ११७५.४४ | १२४४.४३ | ११४७.९७ | १२९०.५० |
| ठेवी | २३७६.७६ | २५४०.९३ | २५८३.१९ | २७१२.२५ | २८३२.०० |
| कर्ज | १६२३.४३ | १७२६.९८ | १५५७.१५ | १८३९.०५ | २१४३.८० |
| गुंतवणुक | १७४०.९४ | १९०३.११ | २१६७.६४ | १९१९.७४ | १८९०.७१ |
| नफा | ४९.४० | ५१.९० | ५२.९१ | ५६.७७ | ६२.४५ |
| खेळते भाग भांडवल | ३५८४.०१ | ३८५४.२३ | ३९१७.१७ | ३९४७.३१ | ४२०९.२० |
| लाभांश | १०% | १०% | १०% | १२% | १०% (प्रस्तावित) |
| ऑडीट वर्ग | 'अ' | 'अ' | 'अ' | 'अ' | 'अ' |
| शाखा/विस्तारीत कक्ष | ३ | ३ | ३ | ३ | ३ |

## ● सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रकापेक्षा कमी किंवा जास्त मिळालेले उत्पन्न व सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रक ●

| तपशील | २०२३-२०२४ चे अंदाजपत्रक | प्रत्यक्ष मिळालेले उत्पन्न | (-) कमी / (+) जास्त मिळालेले उत्पन्न | २०२४- २०२५ चे अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | २,०५,००,०००.०० | २,३७,९२,८९४.०० | ३२,९२,८९४.०० | २,५२,००,०००.०० |
| गुंतवणुकीवरील व्याज | १,१७,००,०००.०० | १,१३,३०,४९९.०० | -३,६९,५०१.०० | १,००,००,०००.०० |
| इतर जमा | १४,७०,०००.०० | १२,९२,४४४.०० | -१,७०,५५६.०० | १३,४०,०००.०० |
| **एकूण** | **३,३६,७०,०००.००** | **३,६४,२२,८३७.००** | **२७,५२,८३७.००** | **३,६५,४०,०००.००** |

## ● सन २०२३-२०२४ चे अंदाजपत्रकापेक्षा कमी किंवा जास्त झालेला खर्च व सन २०२४-२०२५ चे अंदाजपत्रक ●

| तपशील | २०२३-२०२४ चे अंदाजपत्रक | प्रत्यक्ष झालेला खर्च | (-) कमी झालेला (+) जास्त झालेला खर्च | २०२४- २०२५ चे अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|
| ठेवी व कर्जावरील व्याज | १,९०,००,०००.०० | १,६६,४२,४८८.०० | -२३,५७,५१२.०० | १,९०,००,०००.०० |
| पिग्मी कमिशन | ५,००,०००.०० | ४,२२,८०४.०० | -७७,१९६.०० | ५,००,०००.०० |
| पगार भत्ते | ५०,००,०००.०० | ३४४३,१८७.०० | -१५,५६,८१३.०० | ५०,००,०००.०० |
| भाडे, कर, दिवाबत्ती, विमा | ३,८५,०००.०० | ३,७२,२४९.०० | -१२,७५१.०० | ४,४०,०००.०० |
| दुरध्वनी, पोस्टेज | ८०,०००.०० | ४६,०९३.०० | -३३,९०७.०० | ८०,०००.०० |
| लेखापरिक्षण फी | ३,३०,०००.०० | ३,२६,६१४.०० | -३,३८६.०० | ३,३०,०००.०० |
| घसारा व दुरूस्ती देखभाल | १३,२०,०००.०० | ११,८१,९३७.०० | -१,३८,०६३.०० | १४,००,०००.०० |
| छपाई व स्टेशनरी | १,७५,०००.०० | २,११,४९१.०६ | ३६,४९१.०६ | २,२५,०००.०० |
| इतर खर्च तरतुदी | ९,१५,०१०.०० | ७५,३०,८५७.८८ | ६६,१५,८४७.८८ | २९,९७,०१०.०० |
| नफा | ५९,६४,९९०.०० | ६२,४५,११६.०६ | २,८०,,१२६.०६ | ६५,६७,९९०.०० |
| **एकूण** | **३,३६,७०,०००.००** | **३,६४,२२,८३७.००** | **२७,५२,८३७.००** | **३,६५,४०,०००.००** |

## ● दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा-तोटा पत्रक ●

| ३१ मार्च २०२३ | खर्च | ३१ मार्च २०२४ | ३१ मार्च २०२३ | | ३१ मार्च २०२४ |
|---|---|---|---|---|---|
| रुपये पैसे | | रुपये पैसे | रुपये पैसे | | रुपये पैसे |
| १,४६,६२,१००.०० | ठेवी व कर्जावरील दिलेले व्याज | १,६६,४२,४८८.०० | १,८१,३७,७३४.०० | कर्जावरील व्याज | २,३७,९२,८९४.०० |
| ४,६२,९१२.०० | पिग्मी कमिशन | ४,२२,८०४.०० | ९८,००,६०२.०० | गुंतवणुकीवरील व्याज | १,१३,३०,४९९.०० |
| ३९,४०,९१८.०० | पगार व भत्ते | ३४,४३,१८७.०० | १५,२८,३८५.०० | इतर उत्पन्न | १२,९९,४४४.०० |
| ३,५१,९२२.०० | भाडे, कर, विमा, दीवाबत्ती | ३,७२,२४९.०० | | | |
| ६६,३३३.०० | दुरध्वनी, पोस्टेज | ४६,०९३.०० | | | |
| ३,१८,९४६.०० | लेखा परिक्षण फी | ३,२६,६१४.०० | | | |
| १९,९८,३७५.०० | घसारा व दुरूस्ती देखभाल खर्च | ११,८१,९३७.०० | | | |
| १,६३,११४.०० | स्टेशनरी, छपाई व जाहिरात | २,११,४९१.०६ | | | |
| १८,२५,५८१.७९ | इतर खर्च व तरुदी | ७५,३०,८५७.८८ | | | |
| ५६,७६,५१९.२१ | नफा | ६२,४५,११६.०६ | | | |
| **२,९४,६६,७२१.००** | **एकूण** | **३,६४,२२,८३७.००** | **२,९४,६६,७२१.००** | | **३,६४,२२,८३७.००** |

## ● ताळेबंद ३१ मार्च २०२४ अखेर ●

| ३१ मार्च २०२३ | भांडवल व देणी | | ३१ मार्च २०२४ |
|---|---|---|---|
| रुपये पैसे | | रुपये पैसे | रुपये पैसे |
| | **१) भाग भांडवल** | | |
| १,००,००,०००.०० | अधिकृत भाग भांडवल | | १,५०,००,०००.०० |
| **८७,०९,१००.००** | वसुल भाग भांडवल भाग प्रत्येकी रु. १०० प्रमाणे | | **८६,६०,६००.००** |
| **११,४७,९७,२०५.००** | **२) राखीव व इतर निधी** | | **१२,९०,५०,२२८.२१** |
| ३,८६,७५,५१३.०० | वैधानिक राखीव निधी | ४,३२,०१,६२४.२१ | |
| २,९४,७८,३२७.०० | इमारत निधी | ३,०७,०६,१२७.०० | |
| १७,५१,८५७.०० | सभासद कल्याण निधी | १७,८२,००१.०० | |
| ३३,००,०००.०० | विकास निधी | ३३,००,०००.०० | |
| १,७५,१११.०० | धर्मदाय निधी | २,१०,८७६.०० | |
| ९६,६४,११६.०० | घसारा निधी | १,०३,७७,१२०.०० | |
| १६,६७,०१७.०० | सेवक कल्याण निधी | १७,५०,०१७.०० | |
| १७,७९,४३७.०० | गरजपुर्ती महिला निधी | ८,९३,६५९.०० | |
| ६,००,०००.०० | संगणक निधी | ६,००,०००.०० | |
| ७,९६,०५०.०० | लाभांश समकरण निधी | ८,००,०००.०० | |
| ८,५०,०००.०० | महोत्सव निधी | १०,००,०००.०० | |
| २,१२,९८,७१२.०० | संशयीत निधी | २,९४,६८,७१२.०० | |
| ४,२४,८४४.०० | उत्पादक मालमत्ता निधी | ५,०५,८७१.०० | |
| १,१४,०००.०० | सहकार प्रचार निधी | १,१४,०००.०० | |
| १९,५०,०००.०० | आकस्मित निधी | २०,००,०००.०० | |
| ४५,२२१.०० | सामाजिक उपक्रम निधी | ४५,२२१.०० | |
| १५,००,०००.०० | भागभांडवल निधी | १५,००,०००.०० | |
| १,८५,०००.०० | निवडणूक निधी | २,३५,०००.०० | |
| २,००,०००.०० | गुंतवणुक घसारा निधी | २,००,०००.०० | |
| ३,४२,०००.०० | प्रशिक्षण निधी | ३,६०,०००.०० | |
| **२७,१२,२४,६६१.५६** | **३) ठेवी** | | |
| २३,८८,८९,१५२.०० | मुदत ठेव | २४,८२,६०,३५५.०० | **२८,३२,०९,७५४.५६** |
| ३,२३,३५,५०९.५६ | बचत/चालू ठेव | ३,४९,४९,३९९.५६ | |
| **२,५९,८२,५९३.००** | **४) थकीत व्याज तरतुद** | | **२,४५,८६,५९३.००** |
| **९,८१,१८४.००** | **५) देय व्याज** | | **१०,३६,१६१.००** |
| **४८,३४,१७१.००** | **६) इतर देणी व तरतुद** | | **४८,६३,६८३.८२** |
| **५६,७६,५१९.२१** | **७) नफा** | | **६२,४५,११६.०६** |
| ४३,२२,०५,४३३.७७ | **एकूण** | | ४५,७६,५२,१३६.६५ |

| ३१ मार्च २०२३ | मालमत्ता व येणी | | ३१ मार्च २०२४ |
|---|---|---|---|
| रुपये पैसे | | रुपये पैसे | रुपये पैसे |
| **२,००,५२५.७७** | **१) रोख शिल्लक बँक शिल्लक** | | **१,७०,६०७.२३** |
| १६,४२८.०० | रोख शिल्लक | १९,८८८.०० | |
| १,८४,०९७.०० | बँक शिल्लक | १,५०,७१९.२३ | |
| १९,१९,७३,५५३.०० | **२) गुंतवणुक** | | **१८,९०,७१,२१६.००** |
| ८,५७,२८,२५७.०० | राखीव व इतर निधी गुंतवणुक | ८,९८,९६,६२९.०० | |
| १,२१,५००.०० | शेअर्स गुंतवणुक | १,२१,५००.०० | |
| १०,६१,२३,७९६.०० | मुदत ठेव गुंतवणुक | ९,९०,५३,०८७.०० | |
| **१८,३९,५०,१२३.००** | **३) कर्ज** | | **२१,४३,८०,०२८.००** |
| **३,००,५२,०८८.००** | **४) येणे व्याज** | | **२,८६,१५,१६२.००** |
| ३,००,५२,०८८.०० | कर्जावरील येणे व्याज | २,८६,१५,१६२.०० | |
| **२,१०,५८,९४५.००** | **५) कायम मालमत्ता** | | **२,११,५२,०२८.४२** |
| **४९,७०,१९९.००** | **६) इतर मालमत्ता** | | **४२,६३,०९५.००** |
| १०,०८,७४६.०० | सेवक उपदान (एल.आय.सी.) | ९,४९,७४६.०० | |
| ४,०००.०० | इतर अनामत | ४,०००.०० | |
| ९,२१२.०० | टेलिफोन अनामत | ९,२१२.०० | |
| ४४,१८१.०० | शिल्लक छपाई साठा | ६३,२०२.०० | |
| ३,३४,२५०.०० | कार्यालय अनमात | ३,३४,२५०.०० | |
| १०,८१,२१४.०० | लिव्ह इनकॅशमेट | १०,७०,९५९.०० | |
| ४,९५७.०० | आगाऊ केलेला खर्च | ०.०० | |
| १९,३५,४३२.०० | टी.डी.एस. येणे | १२,८६,७२६.०० | |
| ५,४८,२०७.०० | ॲडव्हान्स | ५,४५,०००.०० | |
| ४३,२२,०५,४३३.७७ | **एकूण** | | ४५,७६,५२,१३६.६५ |

**श्री. एस. आर. पवार**
चार्टर्ड अकौटंट
वैधानिक लेखा परिक्षक

**श्री. जयदिप घन:श्याम शाह**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सौ. सविता गिरिष नाईक**
उपाध्यक्षा

**श्री. राधेश्याम लक्ष्मीनारायण बजाज**
अध्यक्ष

### -● संचालक मंडळ ●-

**श्री. संदिप अमृतलाल लाड**, **श्री. संजय वसंतराव कासार**, **ॲड. श्री. प्रवीण राजमल झवर**, **श्री. राजेंद्र विश्वनाथ पाटील**, **श्री. पद्माकर तुळशीराम इंगळे**
**श्री. मिलिंद घन:श्याम चंदनकर**, **श्री. महेश रामदास संत**, **श्री. प्रमोद कौतिक माळी**, **सौ. शोभना गजानन खोरखेडे**